Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महायुतीचा राज्यपालांकडे सत्ता स्थापनेच्या दावा–मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला युतीच्या घटकपक्षांचा एकमताने पाठिंबा
- तांत्रिक बिघाडामुळे इस्रोच्या पीएसएलव्ही–सी यानाचं प्रक्षेपण आजऐवजी उद्या होणार
- नागपूरसह विदर्भाच्या अनेक भागात भूकंपाचे धक्के–तेलंगणात मुलुगू इथं भूकंपाचा केंद्रबिंदू

आणि

- बीड इथं दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाला प्रारंभ

****

भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या नेत्यांनी आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह मित्रपक्षांच्या एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांकडे सादर करण्यात आलं. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, यांच्यासह केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, भाजप नेते विजय रूपाणी उपस्थित होते. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भाजपचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली –

***सन्माननीय राज्यपाल महोदयांना पत्र दिलेलं आहे. आणि नियमानुसार राज्यामध्ये नवीन मंत्रिमंडळ स्थापन करण्याकरता आमचा दावा मी पेश केलेला आहे. माननीय राज्यपालांनी आमचा दावा त्याठिकाणी घेतल्यानंतर, आम्हाला पाच तारीख संध्याकाळी साडेपाच वाजता***

***शपथविधीची वेळ नेमून दिलेली आहे. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जनसुराज्य पक्ष, युवा स्वाभिमान पक्ष, रासप आणि अपक्ष अशी एक मोठी महायुती या ठिकाणी झालेली आहे या सगळ्यांच्या सहीचं पत्र ते आम्ही दिलेला आहे.***

नवीन सरकाचा शपथविधी उद्या सायंकाळी साडे पाच वाजता मुंबईत आझाद मैदानात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे अनेक सदस्य तसंच राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलतांना महायुतीच्या वतीने मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला एकमताने पाठिंबा देणारं पत्र राज्यपालांकडे सुपूर्द केल्याचं सांगितलं. ते म्हणाले –

***मला आनंद आहे की, अडीच वर्षांपूर्वी देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावा म्हणून माझ्या नावाची शिफारस केली होती. आणि आज देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत अशी शिफारस आणि पाठिंबाचे पत्र शिवसेनेच्या वतीने आज आम्ही दिलंय. आणि यापूर्वीच शिवसेनेचा पाठिंबा आणि पूर्ण समर्थन भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना, देवेंद्रजींना आम्ही देऊन टाकला होता.***

तत्पूर्वी, आज मुंबईत झालेल्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड करण्यात आली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी निरिक्षक म्हणून या बैठकीला उपस्थित होते. चंद्रकांत पाटील तसंच सुधीर मुनगंटीवार यांनी गटनेतेपदासाठी फडणवीस यांच्या नावाचा एकमेव प्रस्ताव मांडला, त्याला सर्वांनी एकमताने अनुमोदन दिलं. त्यानंतर निरीक्षक रुपाणी यांनी फडणवीस यांची गटनेतेपदी निवड झाल्याचं जाहीर केलं.

****

२४वा राष्ट्रीय नौदल दिवस आज साजरा झाला. १९७१ मध्ये ट्रायडंट अभियानादरम्यान पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्यूत्तर देत चार पाणबुड्यांना समुद्रात बुडवण्यात भारतीय नौदलाला यश आलं होतं. या विजयाची आठवण म्हणून नौदल

दिवस साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत ओडिशा इथल्या पुरी इथं ब्ल्यू फ्लॅग बीच वर नौदलातील प्रात्यक्षिकांचे सादरीकरण झालं.

****

रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ वर आज लोकसभेत चर्चा झाली. या विधेयकामुळे रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. काँग्रेसचे मनोज कुमार यांनी यावेळी बोलतांना, वंदे भारत गाड्यांच्या तिकीटाचा दर जास्त असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

****

अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी आज राज्यसभेतून सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर एका खासगी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर काँग्रेस आणि आम आदमी पक्षाच्या सदस्यांनी किमान हमीभाव कायद्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव का दिला नाही, या धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोच्या पीएसएलव्ही–सी या अंतराळ यानाचं प्रक्षेपण पुढे ढकलण्यात आलं आहे. श्रीहरिकोटात सतीश धवन अंतराळ केंद्रातून आज दुपारी चार वाजून आठ मिनिटांनी हे यान प्रक्षेपित केलं जाणार होतं. आता हे यान उद्या दुपारी चार वाजून १२ मिनिटांनी प्रक्षेपित केलं जाईल. तांत्रिक बिघाडामुळे हा बदल करण्यात आल्याची माहिती इस्रोनं दिली आहे.

****

नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याच्या काही भागात आज सकाळी सात वाजून २९ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू तेलंगणा राज्यातल्या मुलुगू इथं असून, भूकंपाची तीव्रता पाच पूर्णांक तीन रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपात कोणतीही जीवित किंवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

****

बीड इथं जिल्हा क्रीडा संकुलावर आज दोन दिवसीय जिल्हा युवा महोत्सवाचं उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्या हस्ते झालं. युवा महोत्सवातून तरुणांच्या गुणवत्ता, क्षमतेला वाव मिळतो आणि त्यातूनच उज्ज्वल देश घडण्यासाठी मदत होते, असं प्रतिपादन जिवने यांनी यावेळी केलं. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा परिषद शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीनं हा युवा महोत्सव भरवण्यात आला आहे. या महोत्सवात विज्ञान आणि तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पनांवरर आधारित स्पर्धा, लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज २०२४-२५ या वर्षाचा अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेतला. जिल्हा वार्षिक योजनेतून केली जाणारी कामे वेळेत पूर्ण करुन उपलब्ध निधी खर्च करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी सर्व विभागप्रमुखांना दिले. प्रलंबित कामे वेळेत तसंच गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्याच्या सूचना पांचाळ यांनी यावेळी विभागप्रमुखांना केल्या.

****

लातूर जिल्हा परिषदेमार्फत जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हास्तरीय दिव्यांग सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांचे आभा क्रमांक काढण्यासाठी विशेष शिबिर घेण्यात आलं. जिल्ह्यात आतापर्यंत अकरा लाख दोन हजार ६६५ आभा क्रमांक काढण्यात आले असल्याचं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यातल्या सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी चालू आर्थिक वर्षातील विकास कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले. मंजूर विकास निधीचा संपूर्ण विनीयोग करावा, तसंच हा निधी परत जाता कामा नये, याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गावडे यांनी दिली.

****

नांदेड जिल्हा रुग्णालयात आज राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेचे उद्‌घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांच्या हस्ते झालं. जिल्ह्यातील शाळांमध्ये एक ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळी खाऊ घालण्यात आली. आज गैरहजर असलेल्या बालकांना दहा तारखेला जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहे.

****

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातल्या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट आरोग्यसंस्था म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं आहे. केंद्रीय आरोग्य विभागाच्या पथकामार्फत या आरोग्य केंद्राची तपासणी करण्यात आली होती.

****

अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष महोत्सव येत्या ८ ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होणार आहे. या महोत्सवात रामायणाचार्य रामराव ढोक महाराजांचे कीर्तन, अभंगवाणी, संगीत रजनी तसंच भजनासह विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त' ६ डिसेंबरला डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित दोन माहितीपट आणि एक चित्रपट, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून प्रसारित करण्यात येणार आहेत.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वेतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त नांदेड - दादर- नांदेड ही अनारक्षित विशेष रेल्वे चालवण्यात येणार आहे. ही रेल्वे उद्या गुरूवारी अदिलाबाद इथून निघणार असून शनिवारी दादर इथून निघणार आहे.

****

ओमान मधील मस्कत इथं सुरू असलेल्या पुरुषांच्या कनिष्ठ आशिया चषक हॉकी स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारतीय संघाने मलेशिया संघाचा ३-१ असा पराभव करत, स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत पाकिस्तान संघाशी होणार आहे.

****